निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२४/अपील/१०/२०२४/0560 दिनांक: ०५.०९.२०२४

| | | |
|---|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | ०७.०५.२०२४ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | : | ०४.०६.२०२४ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : | २०.०८.२०२४ |
| प्रथम अपील निकाली काडल्याचा दिनांक | : | ०५.०९.२०२४ |

**सक्षम प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत)**

**अपील क्र. १०/२०२४**

श्री. जगनसिंह राजपूत ... **अपीलकर्ता**

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई ... **प्रतिवादि**

**आपीलाचे तथ्य:-**

अपीलकर्ता यांनी दिनांक ०६.०५.२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक ०७.०५.२०२४ रोजी प्राप्त झाला. आपीलार्थी यांच्या दिनांक ०६.०५.२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४.०६.२०२४ रोजी चे पत्रांन्वये माहिती मिळविण्यासाठी आपीलार्थी यांनी दिनांक १९.०८.२०२४ रोजी त्याच माहितीसाठी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केले. (अर्ज प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक २०.०८.२०२४ रोजी प्राप्त झाला).

प्रथम आपीलीय अधिकारी यांनी आपीलार्थी यांना दिनांक २२.०८.२०२४ रोजी नोटिस पाठवून दिनांक ३०.०८.२०२४ रोजी अर्जा वर सुनावणी आयोजीत केली होती. दिनांक ३०.०८.२०२४ रोजी सुनावणी साठी आपीलार्थी झाले परंतु जन माहिती अधिकारी यांची वैयक्तिक वैद्यकीय अडचण उद्भवल्यामुळे ते हजर राहू शकत नाहीत असे कळविले आहे. सुनावणी दरम्यान आपीलार्थी यांनी मौखिक निवेदन सादर केले.

**अपीलातील निवेदवारून आपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहे:-**

**मागीतलेली माहिती :**

१. आपल्या अधिन असलेल्या न्यायालय ओंबड्समन व ग्राहक तक्रार न्यायमंच यांना सुट्टीचे दिवस सोडून किती दिवस कार्य व सुनावणी घेणे बंधनकारक आहे याची माहिती स्वाक्षरी प्रत माहिती मिळावी.

२. आपल्या कोणत्याही ग्राहक मंचाचा सदस्य व सचिव दीर्घ किंवा १२ दिवस सुट्टीवर गेल्यास ग्राहक न्यायमंचाची सुनावणी घेऊ नये असा नियम असल्याची स्वाक्षरी प्रत मिळावी.

३. आपल्या महाराष्ट्राच्या कोणत्याही ग्राहक मंचाने सचिव व सदस्य सुट्टीवर आहे त्यासाठी ग्राहक न्यायमंचाची सुनावणी नाही घेतली तर त्यावर काय कारवाईची तरतूद आहे त्याची स्वाक्षरी प्रत मिळावी.

४. आपल्या विज नियामक आयोग म. रा. च्या ओंबड्समन व ग्राहक तक्रार न्यायमंच असल्याची स्वाक्षरी प्रत मिळावी.

५. आपल्या ग्राहक न्यायमंच व ओंबड्समन यांनी नियमविरुद्ध कार्य केले तर कारवाई करण्याचा अधिकार कोणाला आहे त्यांचे नाव हुद्दयासह स्वाक्षरी प्रत मिळावी.

६. आपल्या ग्राहक तक्रार न्यायमंचच्या व विद्युत लोकपालच्या न्याय व्यवस्थापनाच्या पदाधिकाऱ्यांचा कार्यकाल किती वर्षाचा व किती वयापर्यंत आहे त्याची नियमबाध्य स्वाक्षरी प्रत मिळावी.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर:**

१. मुद्दा क्रमांक १ ते ३ मधील विचारलेली माहिती उपलब्ध नाही.

२. मुद्दा क्रमांक ४ साठी महाराष्ट्रात ग्राहक मंच व विद्युत लोकपाल हे, मविनिआ (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२० नुसार कार्यरत आहे. सदर विनियमांची प्रत आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे.

३. मुद्दा क्रमांक ५ आणि ६ साठी याबाबतची माहिती मविनिआ (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२० मध्ये उपलब्ध आहे. सदर विनियमांची प्रत आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण:**

माहिती बद्दल कोणतीही तक्रार नाही परंतु अल्पउत्पन्न धारक असल्यामुळे विनियमांची प्रत संकेतस्थळावर उतरवून घेण्यास असमर्थ आहे.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे:**

सदर अपील माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत विहित केलेल्या कालावधी नंतर प्राप्त झाली आहे.

त्यामुळे सदर अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम आपीलीय अधिकारी यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, 13 वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- 400032 येथे अपील दाखल करू शकता.**

**निर्णय**

**अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.**

(आभिजीत चाटुफळे)

**उप संचालक (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय अधिकारी**

प्रती,

श्री. जगनसिंह राजपूत,
ओमसाई निवास, बॅरेक नंबर ८,
रूम नंबर ४, उल्हासनगर – १
जि. ठाणे. पिन – ४२१००१.

(आभिजीत चाटुफळे)

**उप संचालक (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय अधिकारी**

प्रत,

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई